यावल महाविद्यालयात पर्यावरणपूरक गनेशोत्सवावर कार्यशाळा

दिव्य मराठी

भुसावळ 19-09-2023

# यावलला पर्यावरणपूरक गणेशोत्सवावर कार्यशाळा

प्रतिनिधी | यावल

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विज्ञान विभाग व यावल पालिकेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला. उपप्राचार्य प्रा.अर्जुन पाटील उपस्थित होते. पालिकेच्या शहर समन्वयक स्नेहा रजाळे यांनी, पर्यावरणपूरक उत्सवाचे महत्त्व पटवून दिले.

त्या म्हणाल्या की, उत्सवाचे स्वरूप बदलले आहे. अनेक मंडळे पीओपीच्या मूर्ती स्थापन करतात. मिरवणुकीत डीजे, लाऊडस्पीकरचा अवाजवी वापर करून ध्वनीप्रदूषण करतात. गुलाल, प्लास्टिक, रासायनिक घटकांची उधळण केली जाते. त्यातून पर्यावरणाला हानी पोहोचते. प्रदूषणाचे प्रमाण वाढते. याचा प्राणी, वनस्पती व मानवी आरोग्यावर परिणाम होतो. उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार यांनी, उत्सव साजरा करताना कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन केले. प्रदूषण स्वच्छता निरीक्षक नितेश चांगरे, पालिका कर्मचारी महेंद्र चव्हाण, राहुल चव्हाण, रवी भालेराव, शाहरुख खाटीक यांच्यासह सर्व प्राध्यापक उपस्थित होते.